ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# पीक कर्जदार शेतकऱ्यांच्या आर्थिक अध्ययनाचा अभ्यास करणे

**डॉ. बी. एन . शिंगाडे[1], यरमल महेश सोन्याबापू[2]**

[1]*मार्गदर्शक प्राध्यापक*

[2]*संशोधक*

*संगमनेर नगरपालिका कला ,दा .ज. मालपाणी वाणिज्य व ब .ना. सारडा विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त) संगमनेर*

***Corresponding Author:* डॉ. बी. एन . शिंगाडे**

**DOI - 10.5281/zenodo.14885854**

**प्रस्तावना:**

शेती हा भारतातील प्रमुख उद्योग असून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. कृषी क्षेत्रातील विकास हा देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा आहे. मात्र शेती व्यवसाय अनेक आव्हानांशी सामना करत आहे. पिकांच्या वाढत्या उत्पादन खर्चामुळे नैसर्गिक आपत्ती बाजारातील अस्थिरता आणि अयोग्य कर्ज व्यवस्थापनामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामना करावा लागत आहे.

आजच्या परिस्थितीत अनेक शेतकरी पीक कर्जासाठी आर्थिक संस्थांकडे अवलंबून आहेत. कर्जाच्या परतफेडीतील अडचणींमुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट गडद होत चालले आहे. यामुळे त्यांच्या जीवनमानावर सामाजिक स्थितीवर आणि आर्थिक स्तरावर गंभीर परिणाम होत आहे.

या अभ्यासाचा उद्देश्य शेतकऱ्यांच्या पीक कर्जाच्या समस्येचा सखोल आढावा घेणे त्यास कारणीभूत घटकांचा शोध घेणे आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी उपाययोजना सुचवणे आहे. याद्वारे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचे विश्लेषण कर्ज पुरवठा व्यवस्थेतील अडचणी व कर्ज परतफेडीवर होणाऱ्या परिणामांची परीक्षण केली जाईल. शेतकऱ्यांना शेतीसाठी पीक कर्ज हे देण्यात येत असते त्यामुळे त्यांच्या कर्जाद्वारे आर्थिक गरजा पूर्ण होतात.

**व्याख्या:**

पीक कर्ज म्हणजे शेतकऱ्यांना शेतीसाठी गरजेच्या खर्चाची पूर्तता करण्यासाठी बँका किंवा वित्तीय संस्थांकडून दिले जाणारे अल्पकालीन कर्ज होय.

अल्पकालीन कर्ज हे साधारणता सहा महिने ते एक वर्षाच्या कालावधीसाठी दिले जाते.

शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी यावर कर्जाचा व्याजदर कमी ठेवला जातो.

**संकल्पना:**

पीक कर्जाची ही संकल्पना ग्रामीण आरोग्यवस्थेला आणि कृषी क्षेत्राला चालना देण्याच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका बजावते.

**संकल्पनेचा उद्देश:**

1. शेतीचे उत्पादन वाढवून यामुळे पिकासाठी लागणाऱ्या साहित्याची खरेदी वेळेवर करता यावी.
2. आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी या संकल्पनेचा वापर होतो.

**पीक कर्जाची गरज:**

पीक कर्जाची गरज ही शेतकऱ्यांच्या शेतीसाठी आवश्यक असलेल्या आर्थिक साधनसामग्रीची पूर्तता करण्यासाठी असते.

शेती हा मुख्यता हंगामात धारीत व्यवसाय असल्याने पिकांचे उत्पादन होण्यासाठी शेतकऱ्यांना भांडवलाची गरज असते.

- शेतीच्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी त्यामध्ये बियाणे, खते, कीटकनाशके, औषधे खरेदी करण्यासाठी आवश्यक असते.
- पिकांचे उत्पादन सुधारण्यासाठी ,सुधारित तंत्रज्ञान, संशोधित बियाणे व रसायनांचा वापर करण्यासाठी महत्त्वाची गरज असते.

**पिकांच्या कर्जासाठी असणारे अडथळे:**

पीक कर्जदार शेतकऱ्यांसाठी अनेक अडथळे असू शकतात.

- पीक कर्ज काढले असताना शेतकऱ्यांना कर्जाची परतफेडची समस्या निर्माण होऊ शकते. शेतकऱ्यांना उत्पादनाची थोडक्यात मिळालेली फायदे किंवा संकटांमुळे कर्जाची परतफेड करणे कठीण होऊ शकते.
- प्राकृतिक आपत्तीमुळे पाऊस, दुष्काळ किंवा इतर प्राकृतिक आपत्तींमुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनावर मोठा परिणाम होतो. ज्यामुळे कर्ज परतफेड करण्यात त्यांना अडचणी येतात.
- शेतकऱ्यांचा कमी शिक्षणाचा स्तर असल्यामुळे कर्ज वितरणाची नियम,
- व्याजदर आणि इतर कागदपत्रांची माहिती कमी शिक्षण असलेल्या शेतकऱ्यांना समजावून घेणे कठीण होऊ शकते.

**शेतकऱ्यांच्या पीक कर्जाच्या समस्या व उपाय योजना:**

**समस्या:**

- कर्जाची परतफेड करण्यात अडचण शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांच्या उत्पादन कमी झाल्यास किंवा हवामानातील बदलामुळे उत्पादन घट झाल्यास कर्जाची परतफेड करणे कठीण होते.
- अत्याधुनिक कर्जबाजारी होणे शेतकऱ्यांच्या काही वेळा कर्जाची रक्कम त्यांच्या क्षमतेपेक्षा जास्त होऊन त्यांना कर्जबाजारी होण्याची परिस्थिती निर्माण होते.
- उत्पादन न मिळाल्यास आर्थिक संकट खराब पाऊस किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे उत्पादन घटल्यास शेतकऱ्यांना कर्जाची परतफेड करण्यात समस्या येते.

**उपाय योजना:**

- शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरासंबंधी प्रशिक्षण द्यावी. त्यामुळे ते अधिक उत्पादन घेऊ शकतील. यामुळे त्यांना कर्जाची परतफेड करणे अधिक सोपे होईल.
- कृषी सहकारी संस्था मजबूत करणे त्यामुळे शेतकऱ्यांना कर्ज मिळवण्यास मदत सहज होईल.

**निष्कर्ष:**

पिक कर्जदार शेतकऱ्यांच्या आर्थिक अध्ययनाचा निष्कर्ष हा शेतकऱ्यांच्या कर्जाचा वापर, कर्ज चुकावणारी दर, उत्पादनात घट, तसेच कर्जाच्या पुन्हा भरणा रकमेच्या संबंधी अडचणींना सामोरे जावे लागते. पीक कर्ज हे शेतकऱ्यांसाठी फायदेशीर असले तरी त्याला योग्य नियोजन आणि व्यवस्थापनाची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन आणि संपूर्ण माहिती समजावून सांगणे. पीक कर्ज शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे असते. पीक कर्ज हा आर्थिक मदतीचा महत्त्वाचा घटक आहे असे निदर्शनास आले. शेतकऱ्यांना कर्जफेड करताना समस्या निर्माण होतात.

**संदर्भसूची:**

1. नाबार्ड (राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक), https://www.nabard.org/
2. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (MSC Bank)
3. MSC Bank वेबसाईट
4. शेती आणि शेतकरी आत्महत्या, प्रो. नरेंद्र जाधव. वर्ष:-2010
5. वरवंडी गावातील पीक कर्जदार शेतकरी सोपान भोसले यांची मुलाखत.